# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### माध्यमिक शाळेतील शिक्षकास अतिरिक्त ठरविताना शाळेची विषयनिहाय निकड लक्षात घेणेबाबत

**(१) ९३२ (१८-०३-२०२०) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माध्यमिक शाळेतील शिक्षकास अतिरिक्त ठरविताना शाळेची विषयनिहाय निकड लक्षात घेणे आवश्यक असून विषयांची निकड लक्षात न घेता केवळ सेवा ज्येष्ठतेच्या आधारे शिक्षण सेवकांना सेवामुक्त करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विषयाची निकड समजून शिक्षण सेवकास सेवा सातत्य देण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे काय तसेच शाळेची विषयनिहाय निकड लक्षात घेता सेवामुक्त केलेल्या व शाळेला निकड असलेल्या शिक्षण सेवकास शासन सेवेत पुर्नदाखल करण्यात येणार आहे काय ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) :** (१) व (२) अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनाबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक ०४/१०/२०१७ अन्वये निश्चित करण्यात आलेली असून या मध्ये समायोजन करताना विषयाची आवश्यकता तपासून कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत

---

## राज्यातील प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी संख्या गृहीत धरण्याबाबत

**(२) ९८३ (१८-०३-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.कपिल पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी शिक्षकेतर आकृतिबंधात दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार इयत्ता ९ वी १० वीची विद्यार्थी संख्या गृहीत धरण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी इयत्ता ६ वी ते ८ वी ची संख्या गृहीत धरण्यात यावी, अशी मागणी शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून होत असून उक्त शासन निर्णयामध्ये शिपाई संवर्गासंदर्भात उल्लेख नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयात बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) :** (१) होय.

(२) व (३) शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ अन्वये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतिबंध लागू करण्यात आला आहे. यामध्ये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा समावेश नव्हता. तथापि, तद्नंतर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांबाबत शासन निर्णय दिनांक ११/१२/२०२० अन्वये धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधामध्ये सुधारणा करण्याबाबत

**(३) ९९३ (१८-०३-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४७७३९ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध शासनाने प्रस्तावित केला असून सदर आकृतिबंधाबाबत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आकृतिबंधामध्ये सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) :** (१) व (२) शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ अन्वये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतिबंध लागू करण्यात आला आहे. यामध्ये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा समावेश नव्हता.तथापि, तदनंतर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याबाबत शासन निर्णय दिनांक ११/१२/२०२० अन्वये धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील संस्थांतर्गत प्राथमिक व माध्यमिक विभागातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन कायमस्वरुपी करणेबाबत

**(४) १०१३ (१८-०३-२०२०) डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संस्थांतर्गत प्राथमिक व माध्यमिक विभागातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन प्रतिनियुक्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये करण्यात येत असल्याने अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजन प्रतिनियुक्तीवर न करता कायमस्वरुपी करण्यात यावे अशी शिक्षक संघटनांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिरिक्त शिक्षकांचे कायमस्वरुपी समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) :** (१), (२) व (३) अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक ०४/१०/२०१७ अन्वये निश्चित करण्यात आलेली असून त्यानुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनाची कार्यवाही करण्यात येते.

---

## शिक्षकांच्या दिनांक २ मे, २०१२ नंतर झालेल्या नेमणुकांबाबत

**(५) ३३४३ (२८-०५-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २ मे, २०१२ नंतर शिक्षकांच्या भरतीस बंदी असल्याचे कारण देत शिक्षकांच्या नेमणुकीबाबत चौकशी करण्यात आल्यानंतर शिक्षकांच्या भरतीस दिलेल्या मान्यता अमान्य केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समायोजन मिळालेल्या वाढीव तुकडीवरील कार्यरत शिक्षकांच्या नियुक्त्यांना दिनांक ०७/०६/२००८ व दिनांक २१/०२/२०१३ च्या शासन परिपत्रकानुसार आणि मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सुमोटो आदेशानुसार सदरहू नेमणुका झाल्या असूनही शिक्षकांचे वेतन सुरू केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी शासनाचे प्रचलित नियम, शासन निर्णय, परिपत्रके इ. मधील तरतुदीनुसार तपासून निर्णय घेण्याच्या सूचना आयुक्त, शिक्षण, पुणे यांना दिनांक २६/०३/२०२० च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या होत्या.

त्यानुषंगाने आयुक्त, शिक्षण यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांना दिनांक ०८/०५/२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पायाभूत पदापेक्षा वाढीव पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देऊन वेतन अनुदान मंजूर करणेबाबत

**(६) ४३७२ (०९-०९-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २००३-०४ ते २०१७-१८ या कालावधीत पायाभूत पदापेक्षा वाढीव पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देऊन वेतन अनुदान अद्यापपर्यंत मंजूर करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पायाभूत पदापेक्षा वाढीव पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देऊन वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) :** (१) व (२) राज्यातील उच्च माध्यमिक शाळातील वाढीव पदास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वाढीव पदांना मान्यता देण्यासंदर्भाची कार्यवाही शासन स्तरावर सूरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाढीव पदांवरील कनिष्ठ महाविद्‌यालयीन शिक्षकांच्या मागण्यांबाबत

**(७) ५११८ (१३-१२-२०२०) अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये सुमारे १० ते १५ वर्षांपासून वाढीव पदांवर कार्यरत असलेल्या १३०० शिक्षकांनी दिनांक १२ जून, २०२० पासून आपल्या घरी उपोषण आंदोलन सुरू केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढीव पदांवरील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या उपोषण आंदोलनाची दखल घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक २० जून, २०२० रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीनुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) :** (१), (२) व (३) राज्यातील उच्च माध्यमिक शाळातील वाढीव पदास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वाढीव पदांना मान्यता देण्यासंदर्भाची कार्यवाही शासन स्तरावर सूरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासनाच्या ऑनलाईन संचमान्यतेच्या त्रुटी दूर करण्याबाबत

**(८) ५६२८ (१३-१२-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या सन २०१४-२०१५ पासून ऑनलाईन संचमान्यतेच्या त्रुटी दूर करण्यात येऊन सुधारित संचमान्यता उपलब्ध करुन द्याव्यात अशी मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीवर निर्णय घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२६-०६-२०२२) :** (१) व (२) सन २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीत संचमान्यता न मिळालेल्या शाळांना ऑफ लाईन संचमान्यता शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरून देण्याबाबतच्या सूचना सर्व शिक्षणाधिकारी यांना आयुक्त (शिक्षण) पुणे यांनी त्यांच्या दिनांक २९/११/२०२१ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देऊन वेतन अनुदान मंजूर करणेबाबत

**(९) ५६७३ (१३-१२-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २००३-२००४ ते २०१७-२०१८ या कालावधीतील पायाभूत पदापेक्षा वाढीव पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देऊन वेतन अनुदान अद्यापपर्यंत मंजूर करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पायाभूत पदापेक्षा वाढीव पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देऊन वेतन अनुदान देण्यास शासन विचाराधीन आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-०७-२०२२) :** (१) व (२) राज्यातील उच्च माध्यमिक शाळातील वाढीव पदांस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वाढीव पदांना मान्यता देण्यासंदर्भाची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील लातूर मार्गावर अपघात होऊन मृत्यू झाल्याबाबत

**(१०) ६०८६ (१३-१२-२०२०) श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील लातूर मार्गावरील पवार नगर पाटीजवळ दोन दुचाकींची धडक होऊन एकाचा ट्रकखाली येऊन मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३० ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृताच्या कुटुंबियाला मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-०७-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड ते लातूर रोडवर पवारनगर पाटी जवळ दिनांक २७ ऑक्टोबर, २०२० रोजी ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे ट्रकचा धक्का मोटरसायकलला लागून मोटर सायकल स्वार यांचा ट्रकखाली आल्याने मृत्यू झाला आहे.
(२) सदर प्रकरणी मुखेड (जि.नांदेड) पोलीस स्टेशन येथे दिनांक २७/१०/२०२० रोजी गु.र.नं. ३६६/२०२० भा.द.वि. कलम २७९,३०४(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील दोषी ट्रकचालकास अटक करुन न्यायालयात हजर करण्यात आले. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

मृत व्यक्तींच्या वारसांनी नुकसानभरपाई करीता यथोचित प्राधिकरणाकडे अर्ज करणे आवश्यक आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कानपोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील जमिनीतून मातीचे अवैधरित्या उत्खनन केल्याबाबत

**(११) ८४३९ (१४-०६-२०२१) श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कानपोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील जमिनीतून मातीचे अवैधरित्या उत्खनन करुन सदरहू माती तळोजा एमआयडीसीतील परफॉर्मन्स केमिसर्वली या कंपनीच्या भरावासाठी वापरली जात असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर माती उत्खनन करण्याखेरीज भराव करण्यासाठी महसूल विभागाची परवानगी घेणे आवश्यक असताना याप्रकरणी पनवेल तहसिल कार्यालयाकडून कोणतीही परवानगी घेतली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या माती उत्खनन करणाऱ्या दोषींवर तसेच अवैध उत्खननाकडे दुलक्ष केल्यामुळे शासनाचा महसूल बुडविणाऱ्या दोषी अधिकारी तथा तहसिलदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२२-११-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) मौजे कानपोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील स. नं. १७/२ मधून २१७५.४२ ब्रास माती या गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याप्रकरणी तहसिलदार, पनवेल यांनी दिनांक ०४/०५/२०२१ रोजीच्या आदेशान्वये संबंधिताविरुध्द रुपये ७८,९५,१५१/- एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पैठण व सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यातील वाळू उपसा रोखण्याबाबत

**(१२) ८६४६ (२१-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आडवे उंचेगाव (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील गोदावरी नदीपात्रातून व घारेगाव (ता.पैठण) परिसरातील सुखना नदीतून अवैधरित्या वाळू उपसा सुरु असल्याचे तसेच, जरंडी-माळेगांव (ता.सोयगांव) रस्त्यावर वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या हायवा ट्रक जप्त करुन तहसिल कार्यालयाच्या आवारात लावला असता अज्ञातांनी तहसिल कार्यालयाची संरक्षक भिंत व गेट तोडून हायवा ट्रक पळवून नेल्याची घटना माहे एप्रिल व मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वाळू उपसा बंद करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे शासनास दिला असून वाळू माफिया गोदावरी नदीतून केणी यंत्राच्या सहाय्याने अवैधरित्या वाळू उपसा करीत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या विहिरीतील पाण्याची पातळी कमी होऊन उन्हाळी पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घारेगाव (ता.पैठण) येथील वाळू उपसा रोखण्याच्या कर्तव्यावर असलेल्या कोतवाल व लिपिकास वाळूमाफियांनी मारहाण केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाळू माफियांवर कारवाई करुन अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२२-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) वाळू उपसा रोखण्याच्या कर्तव्यावर असलेल्या कोतवाल व लिपीकास मारहाण केल्याप्रकरणी संबंधितांविरूध्द पोलीस ठाणे, पाचोड येथे गु.र.नं.नं.०१४३/२०२१, दिनांक १५/०५/२०२१ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनुदान पात्र महाविद्यालयातील ग्रंथपालांची पद भरती सुरु करण्याबाबत

**(१३) ८७९१ (२०-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदान पात्र महाविद्यालयातील ग्रंथपाल पदांची भरती अनेक वर्षापासून प्रलंबित असून सदर पदांची भरती प्रक्रिया शासनाने सुरु करावी अशी मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीवर निर्णय घेवून व निर्बंध उठवून पदांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) :** (१) व (२) सद्य:स्थितीत राज्यात कार्यरत असलेले ग्रंथपाल पुरेशा विद्यार्थी संख्येअभावी अतिरिक्त होत आहेत त्यामुळे सद्य:स्थितीत नवीन भरतीची आवश्यकता दिसून येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय शिक्षण विभागाचा चतुर्थीश्रेणी कर्मचाऱ्यांसंदर्भातील शासन निर्णय रद्द करणेबाबत

**(१४) ८९२४ (१५-०६-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानित व अंशतः अनुदानित माध्यमिक शाळा तसेच सर्व शाळांमधील कार्यरत शिपाई, प्रयोगशाळा परिचर, सुरक्षा रक्षक इत्यादी चतुर्थश्रेणीतील पदे रद्द करुन कंत्राटी पध्दतीने भरावयाचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे राज्यात ५२ हजार शिपाई पदे धोक्यात आली असून कंत्राटी शिपाई पदासाठी ग्रामीण भागात प्रतिमहा रुपये ५०००/- व महानगरपालिका क्षेत्र वगळून अन्य भागात रुपये ७५००/- तर शहरी भागात रुपये १०,०००/- मानधन निश्चित केले असून त्याप्रमाणे ही पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आल्याने उक्त शासन निर्णय त्वरित रद्द करून आकृतिबंधानुसार ही पदे भरावी अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग यांचेमार्फत शासनास पत्र पाठवून दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजीचा शालेय शिक्षण विभागाचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजीचा निर्णय रद्द करुन भापकर समितीच्या अहवालानुसार तसेच बेरोजगार होणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत निर्णय घेण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील सर्व खाजगी अनुदानित/ अंशत:अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमधील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदांऐवजी यापुढे सदर शाळांना ठोक स्वरुपात शिपाई भत्ता अनुज्ञेय करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ११/१२/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे. सदर शासन निर्णयामध्ये बदल करण्याची कोणतीही बाब शासनाच्या विचाराधिन नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यात कृषी विषयक योजना राबविणे व कृषी अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) ९००८ (१४-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच पोखरा योजना या दोन्ही योजनेंतर्गत बीजोत्पादन कार्यक्रम यावर्षी राबविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असून कृषी विभागाच्या या योजनांचा गावांगावामध्ये प्रचार व प्रसार करण्यासाठी कृषी सेवक व कृषी सहाय्यकांवर व त्यानंतर गावांना अद्यावत माहिती (update information) उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी तालुका कृषी अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कृषी सेवकांनी आपले भ्रमणध्वनी सतत बदलत असल्याचे तसेच कित्येक गावकऱ्यांना कृषी सहाय्यक कोण आहेत याबाबत काहीच माहिती नसल्याचे व त्यामुळे तालुका कृषी अधिकारी गावागावांना या योजनांची अद्ययावत माहिती देण्यास अपयशी ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला जिल्ह्यातील आत्मा संचालक व आत्मा उपसंचालक ही दोन्ही पदे रिक्त असून त्याचबरोबर अकोला तालुका कृषी अधिकारी हे पद अडीच वर्षापासून तर अकोट तालुका उपविभागीय कृषी अधिकारी हे पद गेल्या तीन वर्षापासून रिक्त असल्याचे तसेच अकोला जिल्हा कृषी अधीक्षक हे पद देखील सध्या प्रभारी अवस्थेत असल्यामुळे कृषी योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यावर त्याचा परिणाम होत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यात अन्न सुरक्षा योजना व पोखरा योजनेंतर्गत बीजोत्पादन कार्यक्रम राबविण्याबाबत व संबंधित कृषी सेवक, कृषी सहाय्यक यांच्या सेवा तत्परतेबाबत तसेच जिल्ह्यातील विविध अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

प्रकल्प संचालक (आत्मा), या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार उपविभागीय कृषी अधिकारी, अकोला यांना सोपवून सदर पदाचे कामकाज हाताळण्यात येत आहे.

उपसंचालक (आत्मा), अकोला या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना सोपवून सदर पदाचे कामकाज हाताळण्यात येत आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार उपविभागीय कृषी अधिकारी, अकोला यांना सोपवून सदर पदाचे कामकाज हाताळण्यात येत आहे.

तरीही खालील योजनांची प्रभाविपणे अंमलबजावणी करण्यात आली आहे.

(i) अकोला जिल्हयात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानातंर्गत अन्नधान्ये पिकांतर्गत सन २०२०-२१ मध्ये एकूण रुपये १०४२.५८ लाखाचा कार्यक्रम मंजूर असून त्यामध्ये पीक प्रात्यक्षिके, प्रमाणित बियाणे उत्पादन व वितरण, एकात्मिक अन्नद्रव्ये व किड व्यवस्थापन, सुधारित कृषी औजारे व सिंचन साधने या बाबींकरीता रुपये १००९.६१ लाख निधी उपलब्ध केला असून

माहे मार्च २०२१ अखेर रुपये ७९९.३१ लाख निधी खर्च झाला आहे. सुधारित कृषी औजारे व सिंचन साधने ही बाब MahaDBT पोर्टलमार्फत राबविण्यात येत असून त्याची अंमलबजावणीची कार्यवाही सुरु आहे.

सदर बाबीसाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर संबंधितांना अनुदान अदायगी करण्यात येणार आहे.

(ii) कृषी विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करीता सहाय्य (आत्मा) अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये अकोला जिल्हयाकरीता रुपये १०१.४९ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता.

त्यापैकी रुपये १००.४२ लाख खर्च करण्यात आलेला आहे.

(iii) अकोला जिल्हयातील ३४४ प्रकल्प गावांत सन २०१८-१९ ते २०२०-२१ दरम्यान खरीप व रब्बी हंगामातील बिजोत्पादनाचा कार्यक्रम ९०५३ हे.क्षेत्रावर घेण्यात आला आहे.

याकरिता ३५५२ शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते त्यापैकी २५९४ पात्र अर्जांना पूर्वसंमती देण्यात आली. प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष पेरणी केलेल्या १८५१ शेतकऱ्यांना रुपये १.८३ कोटी अर्थसहाय्य POCRA-DBT द्वारे वितरीत करण्यात आला आहे.

(४) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे अधिनस्त असलेली गट-क संवर्गातील रिक्त असलेली पदे विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती यांचे स्तरावरुन मागील वर्षी नवनियुक्त ३६ कृषी सेवकांची व ८ कृषी पर्यवेक्षकांची पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत.

राज्यातील कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर नवीन पदभरतीवर निर्बंध घालण्यात आलेले आहेत. सदर निर्बंध शिथिल होताच उक्त रिक्त असलेली पदे प्राधान्याने भरण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोला व परभणी जिल्हयातील नदीपात्रातील अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत

**(१६) ९२११ (१५-०६-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील हट्टा महसूल मंडळांतर्गत तसेच परभणी जिल्हयातील पुर्णा व दुधणा नदीच्या वाळू घाटावरुन यंत्राद्वारे व जे.सी.बी.द्वारे अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याचे तसेच सोनपेठ, पालम, गंगाखेड, पूर्णा, मानवत व पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील ग्रामीण भागातून रात्री अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौ.दूटका (ता.पालम, जि.परभणी) येथील रेती घाटवरुन ठेकेदार अटी व शर्तीचे उल्लंघन करुन महसूल प्रशासनातील अधिकारी/कर्मचारी यांचेशी आर्थिक संगनमत करुन अवैधरित्या वाळू उपसा करुन शासनाचा महसूल बुडवित आहे, तसेच, वाळूचे उत्खनन, विक्री, वाहतूक नोंद दैनिक हिशोब वही याची माहिती संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही, तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाळूची वाहतूक करणाऱ्यावर कोणताही दंड आकारण्यात येत नसून अवैध वाळू उत्खनन सुरु असल्याबाबतची तक्रार स्थानिक नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री व तहसिलदार, पालम यांचेकडे करुनही दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाळू घाटांचा लिलाव करण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे, हट्टा महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी मुख्यालयी राहत नसल्यामुळे तसेच हिंगोली व परभणी जिल्हयातील जिल्हा खनिकर्म अधिकारी, तहसिलदार व मंडळ अधिकारी यांचा दौरा होत नसल्यामुळे पुर्णा व दुधणा नदी घाटांवरून वाळू

चोरी होत असून पुर्णा व दुधणा नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा केल्याने तालुक्यातील घरकुलधारक व शासकीय बांधकामासाठी वाळू उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अवैधरित्या उपसा केलेल्या वाळूचा साठ्यांचा पंचनामा केला आहे काय, किती ब्रास किंमतीचा वाळू साठा केला आहे तसेच अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर दंड आकारुन अद्याप किती दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुर्णा व दुधणा नदीपात्रातील वाळू घाटांचा लिलाव करुन अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२२-११-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हिंगोली तसेच परभणी जिल्ह्यात जप्त केलेली वाळू घरकुल लाभधारक व शासकीय बांधमाकामासाठी वाळू उपलब्ध करुन देण्यास प्राधान्य देण्यात येते.

हिंगोली व परभणी जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरीता जिल्हा, उपविभाग तसेच तालुकास्तरावर भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकामार्फत हिंगोली जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२१ ते माहे मे, २०२१ या कालावधीमध्ये एकूण ३६ प्रकरणात रुपये ८३.८८ लक्ष एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली असून त्यापैकी रुपये ३२.७९ लक्ष दंड वसुल करण्यात आला आहे व ०४ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच परभणी जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२१ ते माहे मे, २०२१ या कालावधीमध्ये एकूण ४१ प्रकरणात रुपये ५४.९८ लक्ष एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली असून रुपये ३२.७१ लक्ष दंड वसुल करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## पश्चिम विदर्भात सोयाबीन लागवड क्षेत्रात सोयाबीन प्रक्रिया उद्योगांना चालना मिळण्याबाबत

**(१७) ९३४७ (१३-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यात सोयाबीनचे लागवड क्षेत्र मोठे असून उत्पादन वाढल्याने या भागात सोयाबीन प्रक्रिया उद्योग सुरु करण्यात आले, मात्र या उद्योगांना अपेक्षित चालना मिळाली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, गोवा या राज्यांच्या धर्तीवर सोयाबीन उद्योगासाठी आवश्यक असलेल्या पाणी, कोळसा, वीज, कुटीर इत्यादी प्राथमिक सुविधा पश्चिम विदर्भात उपलब्ध करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-०४-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सुरु असलेल्या प्रकल्पांना प्राथमिक सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करणेसंदर्भात शासन निर्णयामध्ये जाचक अटींचा समावेश असल्याबाबत

**(१८) ९४८७ (२०-०७-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ६९७२ ला दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजी घेतला असून या निर्णयात अनेक जाचक अटी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्णवेळ ग्रंथपाल पदासाठी विद्यार्थी संख्येची अट शिथिल करण्याची मागणी होत आहे, तसेच, पूर्णवेळ ग्रंथपालांचे समायोजन करण्यासाठी विद्यार्थी संख्येची अट शिथिल करण्याबाबतच्या प्रस्तावाची तपासणी पूर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रंथपालांच्या जाचक अटी शिथील करुन १००० विद्यार्थी संस्थेऐवजी ७०० विद्यार्थी संस्थेमागे एक पूर्णवेळ ग्रंथपाल करावा व २ शाळा मिळून एक पूर्णवेळ ग्रंथपाल असावा, अशी मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीची व प्रस्तावाची दखल घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) :** (१) नाही.

(२), (३) व (४) अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करणेबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कानडखेड (ता.पूर्णा, जि.परभणी) शिवारात अनधिकृतरित्या कत्तलखाना सुरु असल्याबाबत

**(१९) ९९८१ (२१-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी** : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कानखेड (ता.पूर्णा, जि.परभणी) शिवारातील कत्तलखान्यात येणाऱ्या पशुंची कोणतीही वैद्यकीय तपासणी न करता कत्तल करण्यात येत असून सदरहू अनधिकृत कत्तलखान्यातील मांस हे आखाती देशामध्ये निर्यात करुन कत्तलखाना मालक मोठ्या प्रमाणात नफा मिळवित असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अनधिकृत कत्तलखान्यामुळे परिसरात दुर्गंधीचे सम्राज्य पसरत असून तसेच या ठिकाणचे जलस्त्रोत दूषित होवून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अनधिकृत कत्तलखाना बंद करण्याबाबत पूर्णा शहरात नागरीकांनी मोर्चे काढले असून तसेच याबाबतच्या तक्रारी नागरिकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, परभणी व जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत कत्तलखाना बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (११-०७-२०२२) :** (१) हे खरे नाही.

मौजे कानखेडा (ता.पूर्णा, जि.परभणी) शिवारातील मे.रिलायबल ॲग्रो फूडस् हा कत्तलखाना अपेडा नोंदणीकृत असून, सदर कत्तलखान्यास भारतीय खाद्य संरक्षा व मानक प्राधीकरण (Fssai) यांचा परवाना प्राप्त आहे. सदर कत्तलखान्यावर पाच सक्षम अधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्याच्या अनुषंगाने पशुंची कत्तलपूर्व तपासणी केली जाते.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी परभणी यांच्या निर्देशानुसार भरारी पथकाने केलेल्या पहाणीत असे निदर्शनास आल्याचे दिसून येत नाही.

कत्तलखाना बंद करण्याबाबत नागरीकांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रार केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई ते अलिबाग जलमार्ग सुरु करण्याबाबत

**(२०) १२५१९ (३०-०३-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई ते मुंबई, जेएनपीटी, एलिफंटा, रेवस या ठिकाणी जाण्यासाठी नवीन वर्षात नवी मुंबईकरांना वॉटर टॅक्सीचा पर्याय उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच धर्तीवर नवी मुंबई ते अलिबाग जाण्यासाठी मांडवा हा जलमार्ग करण्याची बाब शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नवी मुंबई ते अलिबाग जाण्यासाठी मांडवा जलमार्ग सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०७-०७-२०२२) :** (१) होय.

दिनांक १७/०२/२०२२ पासून सदर जलमार्गावर वॉटर टॅक्सी सेवा सुरु करण्यात आली आहे.
(२) व (३) होय.

नवी मुंबई (बेलापूर) ते मांडवा या जलमार्गावर प्रवासी वाहतूक सुरु होणेसाठी EXPRESSION OF INTEREST (EOI) प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानुसार जलयान धारकांकडून प्रस्ताव प्राप्त झाले असून परवानगी देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.